**राज्य मराठी विकास संस्था, मुंबई यांचेमार्फत "पुस्तकांचे गाव" भिलार ही योजना कार्यान्वित करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**मराठी भाषा विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः पुगाव-२०१८/प्र.क्र.३७/२०१८/भाषा-३**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक
मंत्रालय, मुंबई - ४०००३२.
**दिनांक: १३ सप्टेंबर, २०१९**

**वाचा : १) शासन निर्णय क्र. विसआ-१०१५/प्र.क्र.५०/२०१५/भाषा-३, दि.२४.८.२०१६**

**२) मुख्य सचिव कार्यालयाकडून प्राप्त झालेले दि.३.०९.२०१९ रोजीचे मंत्रिमंडळ बैठकीचे कार्यवृत्त.**

**प्रस्तावना :**

"हे ऑन वे" या वेल्स (इंग्लंड) मधील पुस्तकाच्या गावाच्या धर्तीवर "पुस्तकांचे गाव" ही संकल्पना अस्तित्वात आली. पुस्तकांचे गाव या योजनेचे आंतरराष्ट्रीय स्वरुप लक्षात घेऊन मराठी भाषेचा विकास, प्रचार, प्रसार व वाचन संस्कृतीची जोपासना व्हावी तसेच भाषेची आवड वाढावी या उद्देशाने "पुस्तकांचे गाव" ही संकल्पना आकारास आली. यासंदर्भात संदर्भ क्र.१ च्या शासन निर्णयान्वये समिती गठीत करून या संकल्पनेत सहभागी होणाऱ्या घरांची निवड करण्याबाबत विहीत निकष निश्चीत करण्यात आले. समितीच्या अहवालानंतर घरांची निवड करून सदर उपक्रम राज्य मराठी विकास संस्थेमार्फत कार्यान्वित करण्याचे शासनाकडून निदेश देण्यात आले. सदर विहीत निकषानुसार स्थानिक जनतेने केलेल्या सहभागातून विविध विषयांची विषयानुरूप पुस्तकांची दालने वाचकांसाठी उपलब्ध करून देण्यात आली. या अभिनव उपक्रमाचे उद्घाटन दि.४ मे, २०१७ रोजी करण्यात आले. वाचन संस्कृती वृध्दिंगत व्हावी व रसिक पर्यटक मोठ्या संख्येने पुस्तकांच्या गावी यावेत यासाठी शासन आणि लोकसहभाग यांच्या सहकार्याने हा उपक्रम सुरू करण्यात आला आहे. "पुस्तकांचे गांव" या उपक्रमाची वाढती व्यापकता विचारात घेता हा उपक्रम स्वतंत्रपणे योजना म्हणून व्यापक स्वरूपात राबविण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

**शासन निर्णय :**

मराठी भाषेचा विकास, प्रचार, प्रसार व वाचन संस्कृतीची जोपासना व्हावी या दृष्टीने व मराठी भाषेचे संवर्धन करण्यासाठी तसेच "पुस्तकांचे गाव" हा उपक्रम व्यापक स्वरूपात राबविण्याच्या उद्देशाने सन २०१९-२० या वर्षापासून "पुस्तकांचे गाव" भिलार ही योजना कार्यान्वित करण्यास संदर्भ क्र.२ अन्वये दि.३.०९.२०१९ रोजीच्या मंत्रिमंडळ बैठकीत घेतलेल्या निर्णयानुसार शासन मान्यता देण्यात येत आहे.

२. पुस्तकांच्या गावातील पुस्तकांच्या विविध दालनांना वाचक व पर्यटक मोठया प्रमाणावर भेट देत आहेत. सदर योजनेचे वैशिष्ट्य लक्षात घेता पुस्तकांचे गाव भिलार येथे विविध साहित्यिक उपक्रम, साहित्य प्रकाशन, कार्यशाळा तसेच पुस्तक प्रकाशन कार्यक्रम, परिसंवाद, साहित्य जत्रा, मान्यवर साहित्यिकांचे साहित्यिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यासाठी सदर व्यासपीठाचा उपयोग होण्यासाठी व्यापक स्वरूपात विविध उपक्रम राबविण्याची कार्यवाही राज्य मराठी विकास संस्थेने करावी.

३. पुस्तकांचे गांव या योजनेची भविष्यातील व्यापकता लक्षात घेता त्यासाठी स्वतंत्र लेखाशीर्ष उघडून निधीची तरतूद करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

४. पुस्तकांचे गाव भिलार या योजनेच्या व्यवस्थापनासाठी राज्य मराठी विकास संस्थेअंतर्गत पुढील पदे कंत्राटी पद्धतीने भरण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

| अ.क्र. | पदांचे नाव | पद संख्या |
|---|---|---|
| १. | प्रकल्प व्यवस्थापक | १ |
| २. | प्रकल्प सहायक | १ |
| ३. | कार्यालयीन सहायक | ३ |
| ४. | लिपिक टंकलेखक | १ |
| ५. | शिपाई | १ |
| **एकूण** | | **७** |

उपरोक्त तक्त्यामध्ये नमूद केल्यानुसार अ.क्र.१ व २ येथील २ पदे प्रकल्प कार्यान्वित असे पर्यंत व उर्वरित ५ पदे बाहय यंत्रणेद्वारा आवश्यकता असेल त्यावेळी तात्पुरती भरती करावीत. तसेच भरती प्रक्रियेच्यावेळी वित्त विभागाचे शासन परिपत्रक क्रमांक पदनि-२०१३/ प्र.क्र.११/ १३/विसु-१, दि.२.२.२०१३ तसेच सामान्य प्रशासन विभागाचे शासन परिपत्रक क्रमांक एसआरव्ही-२०१७/प्र.क्र.४५५/कार्या १२, दि. ९.२.२०१८ मधील मार्गदर्शक तत्वांचे राज्य मराठी विकास संस्थेने काटेकोरपणे पालन करावे.

५. विविध साहित्यिक उपक्रम, कार्यशाळा, परिसंवाद तसेच मान्यवर साहित्यिकांचे साहित्यिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यासाठी खुले प्रेक्षागृहाचे बांधकाम करण्यासाठी जुने गावठणातील ग्रामपंचायत नमुना नं. ८ मधील मिळकत क्र. १७४ ते १९७ मधील १ हेक्टर १२ आर ही जमीन मराठी भाषा विभागाच्या नावे करण्याबाबतची कार्यवाही महसूल व वन विभागाकडून स्वतंत्रपणे करण्यात येत आहे. तथापि पुस्तकाच्या गावास भेट देणा-या पर्यटकांच्या सोयीसाठी खुल्या प्रेक्षागृहाचे व्यवस्थापन, समुह निवा-याची सोय, स्वच्छतागृहाचे बांधकाम, वाहनतळ उभारणी, रस्ते दुरूस्ती, पाणीपुरवठा, धनकचरा व्यवस्थापन यासारख्या पायाभूत सुविधांची उभारणी याकरीता संबंधित प्रशासकीय कार्यालयाशी संपर्क साधून समन्वयाचे काम तसेच प्रकल्प व्यवस्थापन व देखभालीची जबाबदारी राज्य मराठी विकास संस्थेची राहील.

६. सदर प्रकल्पाकरीता सन २०१९-२० या आर्थिक वर्षात नवीन लेखाशिर्षाअंतर्गत उपलब्ध नियतव्यय व अर्थसंकल्पीय तरतूदीच्या अधीन राहून खर्च करण्यास मान्यता देण्यात येत आहे. सन २०१९-२० या आर्थिक वर्षात नवीन लेखाशिर्षांतर्गत पुरेशी आर्थिक तरतूद करण्याकरीता विहित रकमेची पुरवणी मागणी सादर करण्यात यावी.

७. या योजनेची उद्दिष्टे साध्य होण्याच्या दृष्टीने अनिवार्य, अत्यावश्यक खर्च योग्य ती प्रक्रिया करुन पार पाडून वित्त विभागाकडून वेळोवेळी देण्यात येणाऱ्या निदेशांचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे. तसेच संस्थेचे लेखापरीक्षण सनदी लेखापालांकडून प्रतिवर्षी करण्यात यावे व त्याचा अहवाल शासनास सादर करण्यात यावा.

८. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक **२०१९०९१३१०५२५४९१३३** असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Aparna Arvind Gawde

Digitally signed by Aparna Arvind Gawde
DN: CN = Aparna Arvind Gawde, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = Marathi Language
Date: 2019.09.13 15:45:13 +05'30'

**( अपर्णा अ. गावडे )**
**सह सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. मा.राज्यपालांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई,
२. मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई,
३. मा.सर्व मंत्री यांचे खाजगी सचिव/स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई,
४. मा.सर्व राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव/स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई,
५. मा.विरोधी पक्षनेता, विधान सभा/विधान परिषद, महाराष्ट्र विधान मंडळ सचिवालय, मुंबई,
६. मा. मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई,
७. सर्व मंत्रालयीन विभागांचे अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव,
८. प्रबंधक, लोक आयुक्त आणि उप लोक आयुक्त कार्यालय, मुंबई,
९. महालेखापाल, महाराष्ट्र-१ (लेखापरीक्षा / लेखा व अनुज्ञेयता), मुंबई, नागपूर,
१०. महालेखापाल, महाराष्ट्र-२ (लेखापरीक्षा / लेखा व अनुज्ञेयता),मुंबई, नागपूर,
११. अधिदान व लेखाधिकारी, मुंबई,
१२. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई,
१३. सर्व मंत्रालयीन विभाग,
१४. सर्व विभागीय आयुक्त,
१५. सर्व जिल्हाधिकारी,
१६. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
१७. भाषा संचालक, भाषा संचालनालय, बांद्रा, मुंबई,
१८. अध्यक्ष / सचिव महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई,
१९. अध्यक्ष / सचिव, महाराष्ट्र राज्य विश्वकोश निर्मिती मंडळ, मुंबई,
२०. संचालक / प्रशासकीय अधिकारी, राज्य मराठी विकास संस्था, मुंबई,
२१. मराठी भाषा विभाग / सर्व कार्यासने,
२२. निवड नस्ती (भाषा-३).